क्रि.किरकोळ अर्ज क्र.१२६/२०१९

निशाणी – ४५

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक – ०२ मी शपथपूर्वक सांगते कि –</u>**

**माझे नाव –** शरद ज्ञानदेव माने

**वय** – ३८, **व्यवसाय**– क.लिपीक, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सातारा.

**राहणार–** सातारा, ता.सातारा, जि.सातारा

**<u>साक्षीदाराचा सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री.एम.एस.शानबाग यांचे मार्फत शपथेवर सरु –</u>**

१. मी गेली १२ वर्षे परिवहन कार्यालयात कार्यरत असून सातारा येथे गेली ४ वर्षे क.लिपीक म्हणून कार्यरत आहे. आमच्या कार्यालयाला न्यायालयामार्फत साक्षीसमन्स प्राप्त झाले त्याकरीता साक्ष देणेकामी माझी नेमणूक केल्याचे पत्र मी दाखल केले आहे. (साक्षीदारास निशाणी ४४/३ वरील पत्र दाखविले.) त्या पत्रावर सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा संदीप म्हेत्रे यांची सही आहे. त्याच्या सोबत काम केल्याने मी त्यांची सही ओळखतो. पत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. पत्राला **<u>निशाणी ४६</u>** देण्यात येते.

२. मी वाहनाचे मुळ नोंदणी रजिस्टर आज आणले आहे. एखाद्या व्यक्तीने वाहन खरेदी केल्यानंतर त्याची नोंदणी रजिस्टरमध्ये केली जाते. त्यात त्याचे नाव, वाहन क्रमांक, इंजिन नंबर, चेसीस नंबर इ. नमुद असते. साक्षीदारास निशाणी ४४/२ वरील रजिस्टरची साक्षांकीत प्रत दाखविली) त्यामध्ये अमोल शिवलिंग सदाफुले रा.वाई यांची मालक म्हणून नोंद असून त्यांनी ट्रॅक्टर हे वाहन खरेदी केले आहे. त्याचा नोंदणी

क्र.एम.एच.११ बी.ए. १६०१ असा आहे. ती नोंदणी होताना त्यावर वाहन मालकाची सही तसेच हे रेकॉर्ड ज्यांनी लिहले त्या लिपीकाची सही असते. त्यावर निलेश पवार या लिपीकाची सही आहे. ती सही त्यांच्यासोबत काम केल्याने मी ओळखतो. रजिस्टर मधील मजकूर मुळ रजिस्टर प्रमाणे बरोबर आहे. रजिस्टरच्या साक्षांकीत प्रतीस **निशाणी ४७** देण्यात येते.

३. मी वाहनाचा माहितीचा दाखला दाखल केला आहे. साक्षीदारास निशाणी ४४/1 वरील दाखला दाखविणेत आला. तो दाखला मुळ रजिस्टरवरुन तयार केला जातो. दाखल्यावर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सातारा यांचा शिक्का व श्रीमती वंदना जगताप, क.लिपीक यांची सही आहे. त्यांच्या सोबत काम केल्याने मी ती सही ओळखतो. दाखल्यातील मजकूर मुळ रजिस्टरप्रमाणे बरोबर आहे. दाखल्यास **निशाणी ४८** देण्यात येते.

**साक्षीदाराचा उलटतपास जाबदार तर्फे वकील श्री.एस.डी.मंडले यांचे मार्फत सुरु –**

४. वाहनाची खरेदी दिनांक ०२/०१/२०१३ ची आहे. ते वाहन वापरातील आहे किंवा नाही याचे रेकॉर्ड आत्ता माझ्याकडे नाही. हे खरे की, कोरोना काळात वाहन वापरात आहे का बंद आहे याचे रेकॉर्ड आम्ही ठेवले आहे.

उलटतपास पूर्ण, फेरसरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. १७/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव